# डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी),पुणे मार्फत ऑनलाईन सैन्य व पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण २०२०-२१.

## प्रेस-नोट

डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी),पुणे मार्फत महाराष्ट्रातील सर्व उमेदवारांसाठी पोलीस भरतीच्या लेखी परीक्षेसाठी **नि:शुल्क ऑनलाईन मार्गदर्शन दि.२५/०२/२१** पासून सुरु करण्यात आले आहे. इच्छूक उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्याची प्रक्रिया बार्टी,पुणे च्या www.barti.in या संकेतस्थळावर नोटीस बोर्ड तसेच ई-बार्टी अॅप मधील M-governance अंतर्गत मध्ये "पोलीस भरती लेखी परीक्षा मार्गदर्शन" या लिंकवर सुरु आहे.

पोलीस भरती पूर्व लेखी परीक्षेकरिता एकूण **दोन महिन्यांचे** प्रशिक्षण देण्यात येईल व आवश्यकते प्रमाणे सदर कालावधी वाढवण्यात येईल, **दर शनिवारी व रविवारी तसेच शासकीय सुट्यांच्या दिवशी** मार्गदर्शन वर्ग बंद राहतील, पोलीस भरती पूर्व लेखी परीक्षेकरिता असलेले **सामान्य ज्ञान, मराठी व्याकरण, गणित, बुद्धिमत्ता चाचणी** असे एकूण ४ अभ्यास घटकांचे दिवसाला २ तास प्रमाणे Online प्रशिक्षण असेल.प्रत्येक विषयाला स्वतंत्र मार्गदर्शक असतील.

सदर प्रशिक्षण वर्ग बार्टीच्या **'Barti Online'** या युट्यूब चॅनल वरून Live करण्यात येतील.**सदरचे प्रशिक्षण Interactive स्वरूपाचे असेल** तसेच प्रशिक्षणामध्ये विषयाचा आवाका, मागील वर्षी विचारण्यात आलेले प्रश्न, जास्त प्रश्न विचारले जाणारे घटक, अशा घटकांचा सखोल अभ्यास करण्याची पद्धत, वाचन साहित्य, तज्ञ मार्गदर्शकांच्या नोट्स याबाबत सखोल मार्गदर्शन केले जाईल. उमेदवारांना काही शंका उपस्थित झाल्यास त्यांचे मेलद्वारे निरसन करण्यात येईल.

बार्टी संस्थेद्वारे आयोजित Online प्रशिक्षणाचा लाभ घेतलेल्या उमेदवारांना त्यांच्या जिल्ह्यात प्रकल्प अधिकारी, समतादूत यांच्या माध्यमातून शारीरिक प्रशिक्षण (मैदानी प्रशिक्षण) बाबत Orientation Class घेण्यात येईल.

**मा.महासंचालक यांच्या मान्यतेने.**

**निबंधक**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन**
**व प्रशिक्षण संस्था (बार्टी),पुणे.**